**वित्तीय वर्ष, २०१४-१५ च्या वार्षिक योजनेतील नियतव्ययाच्या प्रदेशनिहाय संवितरणाकरिता, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील नियम ७ अन्वये महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी दिलेले निदेश.**

**प्रास्ताविक**

१. भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये भारताच्या राष्ट्रपतींनी केलेल्या " महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) आदेश, १९९४" याद्वारे विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळांच्या क्षेत्रांच्या संबंधात संविधानाच्या अनुच्छेद ३७१ चा खंड (२) उपखंड (ख) आणि (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपवली आहे. दिनांक ५ सप्टेंबर, २०११ रोजी, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी " विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश २०११" काढला (यात या पुढे ज्याचा उल्लेख "आदेश" असा करण्यात आला आहे) व त्याद्वारे उक्त तीन प्रदेशांसाठी स्वतंत्र विकास मंडळे गठित केली.

२. उक्त आदेशाच्या नियम ७ अनुसार, एकूण राज्याच्या म्हणून असलेल्या गरजांचा विचार करुन, विकास मंडळांच्या क्षेत्रांवरील विकास खर्चासाठी निधींचे समन्याय्यतेने नियतवाटप होत असल्याची खात्री करुन घेणे, ही महाराष्ट्राचे राज्यपाल यांची विशेष जबाबदारी आहे.

३. उक्त आदेशाच्या नियम ८ अनुसार, राज्यपाल यांनी केलेले निधींचे किंवा नियतव्ययांचे नियत वाटप, राज्य विधानमंडळापुढे ठेवावयाच्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रात दर्शवण्यात येईल आणि उपरोक्तपणे नियतव्ययांच्या संबंधातील विकास कार्ये, राज्य शासन पार पाडील किंवा पार पाडावयास लावील आणि असे नियतवाटप केलेले निधी हे, एका मंडळाकडून दुस-या मंडळाकडे न वळवता येण्याजोगे असतील.

**सिंचन क्षेत्रातील अनुशेषाची विद्यमान स्थिती**

४. निर्देशांक व अनुशेष समितीने सिंचन क्षेत्रातील (०१.०४.१९९४ रोजीच्या) जिल्हानिहाय अनुशेषाचे मूल्यमापन केले होते.**(जोडपत्र-१).** सिंचन क्षेत्रातील ०१.०४.१९९४ रोजीचा वित्तीय अनुशेष रु. ७४१८ कोटी होता. वर्ष २००० मध्ये त्याची पुनर्गणना प्रचलित मापदंड विचारात घेऊन रु.६६१८.३७ कोटी इतकी सुधारीत करण्यात आली होती. सन २००१ पासून हा अनुशेष भरुन काढण्याच्या मुख्य उद्देशाने राज्यपाल निदेश देत आले आहेत. मार्च २०११ पर्यंत सर्व जिल्हयांमधील वित्तीय अनुशेष भरुन निघाला आहे. एप्रिल १९९४ रोजी असलेल्या निव्वळ पेरणी क्षेत्राच्या संदर्भात निर्माण केलेल्या सिंचन क्षमतेची रब्बी समतुल्य एककामध्ये राज्य सरासरी ३५.११% होती. अनुशेषांतर्गत जिल्हयांसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिल्यामुळे भौतिक अनुशेष सुद्धा भरुन निघेल असे अपेक्षित होते. मात्र कालापव्यय आणि दर वाढ यांमुळे भौतिक साध्याबाबत अनुरुप कामगिरी झाली नाही.

५. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्या अहवालानुसार, सिंचन अनुशेष राज्यातील बुलढाणा, अकोला, वाशिम आणि अमरावती या चार जिल्हयांमध्ये सध्या अस्तित्वात आहे. जलसंपदा विभागाने २०१०-११ पासून २०१४-१५ पर्यंतची या भौतिक अनुशेष निर्मूलनाची पंचवार्षिक योजना तयार केली होती. या योजनेनुसार, सन २०१०-११ व सन २०११-१२ मध्ये अनुक्रमे ३७,३१४ हेक्टर आणि ५८,६८३ हेक्टर भौतिक अनुशेष निर्मूलन करण्याचा प्रयत्न करणे अपेक्षित होते. मात्र, या वर्षांचे प्रत्यक्ष साध्य फक्त ९५७० हेक्टर व १३,९२९ हेक्टर एवढे झाले.**(जोडपत्र-२)** परिणामी, जलसंपदा विभागाला ही योजना वार्षिक लक्ष्ये सुधारित करावी लागली आणि योजनेचा कालावधी २०१५-१६ पर्यंत करावा लागला. **जोडपत्र-३** मध्ये अमरावती विभागाची भौतिक अनुशेष निर्मूलनाची सुधारित योजना दर्शविण्यात आली आहे. **जोडपत्र-४** मध्ये भौतिक अनुशेष निर्मूलनाचा अनुषंगीक वित्तीय कार्यक्रम दर्शविण्यात आला आहे. वर्ष २०१२-१३ मध्ये निर्धारित २७,५६४ हेक्टर पैकी प्रत्यक्ष भौतिक साध्य ६७५० हेक्टर (रसतू) इतके झाले असल्याचे कळविण्यात आले आहे. त्यामूळे उर्वरित भौतिक अनुशेष जून २०१३ अखेर २,२७,२६९ हेक्टर (रसतू) एवढा आहे. राज्यपाल यांनी चिंता व्यक्त केली आहे की, प्रशासकीय बाबी, जसे सुधारित प्रशासकिय मान्यता आणि निधीचे पुनर्विनियोजन, भूसंपादन आणि पुनर्वसन, वन मान्यता आणि रिक्त पदे भरणे, यावर अदयापही समाधानकारकरित्या मार्ग निघाला नाही. राज्यपाल यांना असे वाटते की, अनुशेष निर्मूलनाच्या कमी वेगाबाबतची ही काही प्राथमिक कारणे आहेत.

**सिंचन क्षेत्रातील नियतवाटपाची तत्वे (जनजाति उपयोजना)**

६. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, जनजाती उपयोजने अंतर्गत उपलब्ध निधीचे प्रदेशनिहाय वितरण त्या त्या प्रदेशाची आदिवासी लोकसंख्या आणि आदिवासी उपयोजनेखालील क्षेत्रफळ यांना प्रत्येकी ५०% भारांक देवून करण्यात यावे. जनगणना २०११ नुसार आदिवासी लोकसंख्या या साठी उपयोगात आणण्यात आली आहे. या तीन प्रदेशांसाठी असलेली आदिवासी उपयोजना निधींच्या हिश्यांची टक्केवारी **जोडपत्र ६-ब** मध्ये दिलेली आहे.

**२०१४-१५ या वार्षिक योजनेमध्ये सिंचन क्षेत्राकरिता नियतवाटप**

७. नियोजन विभागाने दिनांक ८ फेब्रुवारी, २०१४ रोजीच्या पत्राद्वारे असे दर्शविले आहे की, वार्षिक योजना २०१४-१५ मध्ये जलसंपदा विभागाकरिता **रु. ९२८१.०४ कोटी** इतके एकूण नियतवाटप उपलब्ध करुन देण्यात आले आहे. यापैकी, **रु. १३९६.०८ कोटी** इतकी रक्कम पूर नियंत्रण, खार जमिनी, जलविद्युत प्रकल्प, लाभक्षेत्र विकास, महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार कार्यक्रम, सामाईक योजना (जल विज्ञान प्रकल्प, यांत्रिकीकरण व गुणवत्ता नियंत्रण इ.) आणि घ्यावयाचे प्रकल्पांचा शेल्फ निर्माण करणे यासारख्या

योजनांसाठी राखून ठेवण्याचे प्रस्तावित आहे. आंतरराज्य प्रकल्पांसाठी **रु.१०० कोटी** आणि गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पासाठी **रु. ८७५ कोटी** इतके नियतवाटप प्रस्तावित करण्यात आले आहे. राज्यपाल यांनी, राज्यशासनाच्या शिफारशीनुसार, ५ आंतरराज्य प्रकल्प आणि गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पांसाठी पुरेसा निधी प्राथम्याने मिळण्याच्या दृष्टीने निदेशांच्या कक्षेबाहेर ठेवण्यास संमती दिली आहे. जलसंपदा विभागाकरिता उर्वरित **रु. ७००४.९६ कोटी** इतके विभाज्य नियतवाटप आहे. यामध्ये आदिवासी विकास विभागाच्या दिनांक १२ फेब्रुवारी २०१४ च्या शासन निर्णयानुसार आदिवासी उपयोजनेखालील **रु. १३९.२३ कोटी** अंतर्भाव आहे. म्हणून जलसंपदा विभागासाठी सर्वसाधारण योजनेअंतर्गत **रु. ६८६५.७३ कोटी** उपलब्ध आहेत.

८. शासनाने दर्शविलेली निधीची उपलब्धता, अनुशेष निर्मूलनाच्या पंचवार्षिक योजनेप्रमाणे लागणारा आवश्यक निधी, आणि एकूण राज्याच्या म्हणून असलेल्या गरजा लक्षात घेऊन, राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की , वार्षिक योजना २०१४-१५ मध्ये सिंचन क्षेत्राकरिता नियतवाटप खालील प्रमाणे करण्यात येईल.

(i) सिंचन क्षेत्रासाठी एकूण नियतवाटपाच्या विभाज्य तरतूदीमधून, ज्या जिल्हयांचा भौतिक अनुशेष शिल्लक आहे, त्या अमरावती विभागातील ४ जिल्हयांसाठी पुरेसा निधी प्रथम राखून ठेवण्यात येईल. अनुशेष निर्मूलनासाठीच्या निश्चित केलेल्या प्रकल्पांची कामाची प्रगती लक्षात घेऊन राज्यपालांचे असे मत आहे की, या ४ जिल्हयांसाठी **रु. ७५० कोटी** इतकी अतिरिक्त तरतूद करण्यात यावी.

(ii) वर स्पष्ट केल्याप्रमाणे अनुशेष दूर करण्याकरिता आवश्यक निधी राखून ठेवल्यानंतर, राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, तीन प्रदेशांमध्ये विभाज्य योजना नियतव्ययाचे वाटप त्या प्रदेशांची लोकसंख्या आणि निव्वळ पेरणी क्षेत्र यातील प्रत्येक घटकाला सम भारांकाच्या आधारे करावे. तीन प्रदेशासाठी निधीच्या हिश्श्याची टक्केवारी **जोडपत्र-६ अ** मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

(iii) मागील निदेशांमध्ये अर्थिक वर्ष २००८-२००९ पर्यंतच्या खर्चाच्या अधिक/तुटीच्या प्रदेशनिहाय दुरुस्त्या अमलात आणण्यात आल्या आहेत. मात्र, पाटबंधारे महामंडळांकडील दि.०१.०४.२००९ रोजीच्या शिल्लक रकमा चुकीच्या कळविण्यात आल्या असल्याबाबत जलसंपदा विभागाने दर्शविले होते. दि. १३ मार्च २०१३ रोजीच्या निदेशातील परिच्छेद ३९ नुसार, जलसंपदा विभागाने त्यांच्या दि.६ जानेवारी २०१४ च्या पत्रान्वये सुधारित आकडे कळविले आहेत. त्यानुसार, दि. २७ मे २००९ च्या निदेशातील जोडपत्र (V) (C) सुधारीत करण्यात आले आहे. आणखी, उपरोक्त संदर्भीय पत्राने जलसंपदा विभागाने कळविलेल्या खर्चाच्या आकडयांच्या आधारावर आर्थिक वर्ष २००९-१० ते आर्थिक वर्ष २०१२-१३ साठीच्या प्रदेशनिहाय दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. या दुरुस्त्या जोडपत्र ७ (अ) ते ७ (फ ) प्रमाणे आहेत. या दुरुस्त्या आर्थिक वर्ष २०१४-१५, २०१५-१६ आणि २०१६-१७ या तीन वर्षात समान टप्यात करण्यात येतील.

(iv) राज्यपाल यांच्या असे निदर्शनास आले आहे की विदर्भातील प्रकल्पांची मागणी लक्षात घेता हाती घ्यावयाच्या प्रकल्पांचा शेल्फ तयार करण्यासाठीचा नियतव्यय पुरेसा नाही. नक्त प्रत्याक्षी मूल्य अदा करण्यासाठी होणा-या उशीरामुळे प्रकल्पांचा शेल्फ करण्यासाठी उशीर होतो याची त्यांनी नोंद घेतली आहे. म्हणून राज्यपाल यांनी असे निदेशीत केले आहे की जरी नक्त प्रत्याक्षी मूल्य आणि इतर बाबी यांची गरज अविभाज्य नियतव्ययातून भागविण्यात येत असले तरी, प्रथमतः गरजेनुसार विपाविम कडील उपलब्ध निधीतून हा खर्च भागविण्यात यावा आणि तदनंतर पुढील वार्षिक योजनेच्या अविभाज्य खर्चामध्ये गृहित धरण्यात यावा.

(v) जनजाति उपयोजनेखालील निधीचे नियतवाटप **जोडपत्र-८ (ब)** मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावे.

(vi) सिंचन क्षेत्रासाठी प्रदेशनिहाय अंतिम नियतवाटप खालील तक्त्यात दिले आहे. (रु. कोटी)

| प्रदेश | उर्वरित विभाज्य निधीचे नियतवाटप **(जोडपत्र ८ (ब) पहावे)** | आदिवासी उप योजना निधीचे नियतवाटप **(जोडपत्र-८ (अ) पहावे)** | एकूण नियतवाटप |
|---|---|---|---|
| विदर्भ | २७८६.१३ | ५८.६१ | २८४४.७४ |
| मराठवाडा | १३०१.२९ | ७.४९ | १३०८.७९ |
| उर्वरित महाराष्ट्र | २७७८.३१ | ७३.१३ | २८५१.४४ |
| एकूण | ६८६५.७३ | १३९.२३ | ७००४.९६ |

९. अनुशेष असलेल्या अमरावती, अकोला, वाशिम आणि बुलढाणा या जिल्हयांचा अनुशेष दूर करण्यासाठी राखून ठेवलेले नियतवाटप हे, उर्वरित विभाज्य नियतव्ययातून या जिल्हयांसाठी जलसंपदा विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या नियतवाटपाच्या अतिरिक्त असेल. अनुशेष आणि उर्वरित विभाज्य नियतव्यय यांच्या उपलब्ध झालेल्या एकत्रित नियतवाटपातून या जिल्हयांमधील चालू कामांसाठी, अनुशेष दूर करण्यासाठी अग्रक्रम ठरविलेल्या प्रकल्पांच्या कामांसह, लागणा-या निधीची पूर्तता होईल, अशी अपेक्षा आहे.

१०. आणखी राज्य शासनाने, सिंचन क्षेत्रासाठी अर्थसंकल्पाशिवाय बाजारातून कर्जे घेण्याचा मार्ग अवलंबल्यास, अशा प्रकारे उभारलेला पैसा हा, संपूर्ण राज्यासाठी असावा आणि वर दर्शविल्याप्रमाणे, तीन विकास मंडळांमध्ये वरील परिच्छेद ८(ii) मध्ये दर्शविल्याप्रमाणे

समन्यायतेने विभागण्यात यावा. आणखी असे की, या निदेशामध्ये अंतर्भूत असलेल्या नियतवाटपांशिवाय, सिंचन क्षेत्रासाठी पुरवणी मागण्यांद्वारे अतिरीक्त तरतूद उपलब्ध झाल्यास त्यांचे संवितरण **जोडपत्र-६ (अ)** मध्ये स्पष्ट केलेल्या प्रमाणानुसार या तीन विकास मंडळांच्या क्षेत्रामध्ये करण्यात येईल.

११. वार्षिक योजना २०१४-१५ मधील सिंचन क्षेत्रातील नियतव्ययाचे वितरण हे काटेकोरपणे प्रदेशनिहाय नियतवाटपाच्या प्रमाणात असावे. सचिव(जलसंपदा) यांनी तीनही विभागतील खर्चाचा त्रैमासिक आढावा घ्यावा आणि जशी गरज भासेल तेंव्हा खर्चाबाबतची सुत्रे तंतोतंत जुळण्यासाठी सुधारणेबाबत उपाय योजावेत.

१२. शासनाने अपर मुख्य सचिव (नियोजन), अपर मुख्य सचिव (वित्त ), व प्रधान सचिव (जलसंपदा) यांची समिती प्रकल्पनिहाय नियतवाटप अंतिम करील असे कळविले होते. राज्यपाल यांनी आदेश दिले आहेत की, प्रकल्पांना निधी देतांना ही समिती नियोजन आयोगाने बाराव्या पंचवार्षिक योजनेसाठी विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे अनुकरण करील. नियतवाटप करतेवेळी समितीने पुर्णत्वाच्या मार्गावर असलेल्या प्रकल्पांना अग्रक्रम दयावा, जेणेकरुन त्यांचे फायदे नजिकच्या काळात शेतक-यांना मिळतील.

१३. राज्यपाल यांनी, चालू प्रकल्पांची उर्वरित किंमत लक्षात घेऊन आणि उपलब्ध निधी अनेक प्रकल्पांवर पसरला जावू नये या दृष्टीने,आर्थिक वर्ष २००९-१० ते आर्थिक वर्ष २०१३-१४ च्या निदेशांमध्ये, राज्यशासनाला प्रकल्पांचा प्राथम्यक्रम ठरवून पूर्णत्वाच्या मार्गावर असलेले प्रकल्प काल मर्यादेत पूर्ण करुन त्यांचे फायदे शेतक-यांना मिळतील या दृष्टीने नवीन प्रकल्प हाती घेवू नयेत असे निदेश दिले होते. राज्य शासनाने प्रकल्पांच्या प्राथम्याबाबत खात्री देवून राज्यातील बहूतांश भागांना सिंचनाचे फायदे मिळावेत आणि नजीकच्याा भागांची पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी या दृष्टीकोनातून ६०० हेक्टर क्षमते पर्यंतचे नवीन प्रकल्प हाती घेण्याची परवानगी देण्याबाबत राज्यपाल यांना विंनती केली आहे. मात्र, प्रकल्पांची संख्या आणि त्यांची अपेक्षित किंमत राज्यशासनाने दर्शविली नाही. राज्यपाल यांचे असे मत आहे की, या माहितीशिवाय प्रस्ताव विचारात घेणे म्हणजे आधीच्या साधन संपत्तीवर अनिर्दिष्ट भार टाकल्यासारखे होईल. म्हणून राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की हा प्रस्ताव विचारात घेतल्यास किती आर्थिक ओझे निर्माण होईल हे राज्यशासनाने दर्शवावे. यासाठी जलसंपदा विभागाने प्रत्येक प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल त्याचा सविस्तर सर्वेक्षण, पाण्याच्या उपलब्धतेची खात्री, तांत्रिक-आर्थिक साध्यता प्रथ्थकरण आणि इतर प्रचलित मापदंड यांच्या आधारावर तयार करावा असे राज्यपालांचे निदेश आहेत. राज्यपाल यांचे आणखी असेही निदेश आहेत की नवीन प्रकल्पांची निवड ही मंत्रीमंडळाच्या प्रस्तावानुसारच असावी. राज्यपाल यांचे आणखी असेही निदेश आहेत की जोपर्यंत राज्य शासन चालू प्रकल्पावरील निधीच्या उपलब्धतेवर परिणाम न होऊ देता सदर नवीन प्रकल्पांचे काम तीन वर्षात पूर्ण करण्याच्या दृष्टीने पुरेशी अतिरिक्त साधन संपत्ती उपलब्ध करुन देत नाही, तोपर्यंत नवीन प्रकल्पांवर काम हाती घेण्यात येवू नये. राज्यपाल यांचे असे निदेश आहेत की, वर नमूद केल्या प्रमाणे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केल्या नंतर, एक सर्वकष योजना अतिरिक्त साधन संपत्तीच्या उपलब्धतेसह त्यांचे विचारार्थ सादर करावी.

१४. राज्यपाल यांनी असे निदेशित केले होते की, विदर्भ प्रदेशातील गोदावरी नदीच्या खो-यातील उपलब्ध पाण्याचा पूर्ण वापर होण्यासाठी, शासनाने पर्याप्त प्रकल्प शेल्फवर ठेवण्यासाठी आवश्यकती सर्व पावले उचलावीत. राज्यपाल यांचे असे निदेश आहेत की जलसंपदा विभागाने या निदेशांच्या अनुपालनार्थ शेल्फवर घेण्यात आलेल्या प्रकल्पांची यादी ऑक्टोबर २०१४ पर्यंत सादर करावी. राज्यपाल यांचे असे निदेश आहेत की शेल्फवर असलेल्या प्रकल्पांवरील कामे अतिरिक्त साधनसंपत्ती उपलब्ध झाल्याशिवाय सुरु करु नयेत. राज्यपाल यांनी आणखी असे निदेशित केले आहे की गोदावरी खो-यातील महाराष्ट्र राज्याच्या हिस्याच्या वापर होण्याचा दृष्टीने हे प्रकल्प हाती घेण्याबाबतच्या योजनेचा समावेश परिच्छेद १३ मध्ये नमूद केलेल्या सर्वंकष योजनेमध्ये करण्यता यावा.

**सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेषाची स्थिती**

१५. दिनांक १ एप्रिल, १९९४ रोजी निर्देशांक व अनुशेष समितीने सिंचनक्षेत्र वगळता अन्य सर्व क्षेत्रांमधील परिगणना केलेला एकंदरीत अनुशेष हा, **रु.६५८८.७७ कोटी** इतका होता. वित्तीय वर्ष १९९५-९६ पासून ३१ मार्च २०१३ अखेर पर्यंतचा अनुशेष दूर करण्यावरील झालेला खर्च वजा केल्यानंतर सिंचनाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांतील अनुशेष **रु. ४९२.२९ कोटी** गणना करण्यात आला आहे **(जोडपत्र ९).** वित्तीय अनुशेष फक्त सार्वजनिक आरोग्य क्षेत्रामध्ये अस्तित्वात आहे.

**ऊर्जाक्षेत्रः कृषी पंपसंचाना वीज पुरवठा करणे**

१६. २०१३-१४ च्या निदेशात नमूद केल्या प्रमाणे, ऊर्जा विभागाने कळविल्यानुसार ३१ मार्च २०१३ रोजीच्या कृषी पंप विदयूतीकरण्याचा शिल्लक अनुशेष ४६१०४ होता. विभागाने २०१३-१४ मध्ये १२,७८९ कृषी पंप विदयुतीकरणाचे उदिष्ट ठेवले होते. २०१३-१४ मध्ये ३१ डिसेबंर २०१३ पर्यंत भौतिक साध्य फक्त ३७४१ पंप एवढेच आहे.राज्यपाल यांनी अनुशेष निर्मूलनाच्या कमी वेगाबाबत असमाधान व्यक्त केले आहे.

१७. दि. १३ मार्च २०१३ च्या परिच्छेद २२ नुसार, राज्यपाल यांनी ऊर्जा विभागास सौर ऊर्जेचा वापर करुन कृषी पंप विदयूतीकरणाबाबत अभ्यास हाती घेण्याबाबत निदेशीत केले होते. मात्र, विभागाने असा अभ्यास हाती न घेतल्याबाबत राज्यपालांनी चिंता व्यक्त केली आहे. राज्यपाल यांनी सौर ऊर्जेद्वारे कृषी पंप विदयूतीकरणाच्या गडचिरोली जिल्हयातील पथदर्शी प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत झालेल्या दिरंगाई बद्दल ही खेद व्यक्त केला आहे. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, ऊर्जा विभागाने हा अभ्यास लवकरता लवकर पूर्ण करावा आणि या अभ्यासाच्या शिफारशींच्या आधारावर दुर्गम भागात सौर ऊर्जेचा वापर करुन कृषी पंप विदयूतीकरण्याची योजना अमलात आणावी.

१८. विभागाने ठाणे, रायगड, रत्नागिरी, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्यांमध्ये २०१४-१५ मध्ये १४००० कृषी पंप विदयूतीकरणाचे उद्‌दिष्ट प्रस्तावित केले आहे. त्यासाठी रु. २४६.४० कोटींची मागणी प्रस्तवित केली आहे. राज्यपाल यांचे असे निदेश दिले आहेत की, आर्थिक वर्षे २०१४-१५ मध्ये या क्षेत्रासाठी रु. १५०.०० कोटी ठेवण्यात यावेत. राज्यपाल यांनी आणखी असेही निदेश दिले आहेत की, गरज भासल्यास विभागाने प्रस्तावित उद्‌दिष्ट पूर्ततेसाठी स्वतःच्या साधनसंपत्ती मधून अतिरिक्त निधीची सोय करावी. आर्थिक वर्ष २०१४-१५ साठीचे नियतवाटप जोडपत्र १० मध्ये दर्शविले आहे.

१९. तंत्रनिकेतनाच्या उपक्षेत्रामध्ये भौतिक अनुशेष पूर्णतःदूर झाला असून अनुशेष योजने अंतर्गत निधी संस्थात्मक अनुशेष निर्मूलनासाठी देण्यात येत आहे. २२ तंत्रनिकेतनाची बांधकामे या योजनेअंतर्गत घेण्यात आली होती, त्यापैकी १५ बांधकामे पूर्ण झाली आहेत. विभागाने यासाठी आर्थीक वर्ष २०१४-१५ मध्ये रु. १८.१४ कोटी प्रस्तावित केले आहेत.

२०. तंत्र माध्यमिक शाळा उपक्षेत्रामध्ये, मुंबई जिल्हा (३०९ जागा) आणि मुंबई उपनगर जिल्हा (२४० जागा) असा एकूण ५४९ विदयार्थी जागांचा अनुशेष शिल्लक आहे. विभागाने तंत्र माध्यमिक शाळा बांधकामासाठी अर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये रु. १०.०० कोटींची मागणी प्रस्तवित केली आहे.

२१. औदयोगिक प्रशिक्षण संस्था उपक्षेत्रामध्ये विभागाने वर्ष २०१४-१५ मध्ये चालू बांधकामे पूर्ण करण्यासाठी रु. १२.३२ कोटींची मागणी प्रस्तावित केली आहे. जोडपत्र १० मध्ये प्रदेशनिहाय व उपक्षेत्रनिहाय आर्थिक वर्ष २०१४-१५ साठीचे नियतवाटप दर्शविण्यात आले आहे.

**सार्वजनिक आरोग्य सेवा**

२२. दिनांक १ एप्रिल, २००० रोजी सार्वजनिक आरोग्य क्षेत्रामध्ये **रु. १३५३.६७ कोटी** वित्तीय अनुशेष होता. १ फेब्रुवारी २०१४ पर्यंतचा खर्च विचारात घेता, या क्षेत्रामध्ये रु. ४९२.२९ कोटी चा वित्तीय अनुशेष अदयाप शिल्लक आहे. राज्यपाल यांनी चिंता व्यक्त केली आहे की, गेल्या ४-५ वर्षामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाला अनुशेष निर्मूलनासाठी नियत वाटप केलेल्या निधीपैकी पुरेसा निधी खर्च करणेही शक्य झाले नाही. सार्वजनिक आरोग्य या एकमेव क्षेत्रामध्ये वित्तीय अनुशेष अद्याप शिल्लक आहे याबाबत राज्यपाल यांनी चिंता व्यक्त केली आहे. आणखी, सार्वजनिक आरोग्य विभागाने त्यांनी स्वतः तयार केलेल्या योजने नुसार अनुशेष निर्मूलनाची गती राखलेली नाही. म्हणून, राज्यपाल यांनी असे निर्देशित केले आहे की, सार्वजनिक आरोग्य विभागाने सर्व प्रशासकीय बाबींकडे लक्ष दयावे आणि चालू कामांचे सतत संनियंत्रण करुन ती कामे पुढील २ वर्षात पूर्ण होतील ते पहावे.

२३ राज्यपाल यांनी, विभागाने वित्तीय वर्ष २०१४-१५ करिता ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे, रुग्णवाहिका, उपकरणे व इतर साधनसामग्री आणि फर्निचर या करीता केलेल्या विनंतीनुसार, **रु. २५४.५३ कोटी** ठेवण्याबाबत निदेश दिले आहेत. हे नियतवाटप **जोडपत्र-१०** मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

२४ **सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी नियतवाटप**

राज्यपालांनी असे निदेश दिले आहेत की, वार्षिक योजना २०१४-१५ मध्ये सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांमधील अनुशेष दूर करण्यासाठी रुपये **४४४.९९** कोटी इतक्या रकमेचे नियतवाटप राखून ठेवण्यात यावे. सन २०१४-१५ या वर्षात अनुशेष दूर करण्यासाठी या नियतव्ययाचे प्रदेशनिहाय नियतवाटप खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| अ. क्र. | प्रदेश | अनुशेष निर्मूलनासाठी नियतव्यय (रु. कोटीत) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विदर्भ | १४६.३३ | ३२.८८% |
| २ | मराठवाडा | ६८.७६ | १५.४५% |
| ३ | उर्वरित महाराष्ट्र | २२९.९० | ५१.६७% |
| ४ | एकूण | ४४४.९९ | १००.००% |

२५ आणखी, प्रदेशांतर्गत अनुशेष दूर करण्यासाठीचे क्षेत्र-निहाय नियतवाटप **जोडपत्र १०** मध्ये दर्शविलेले आहे. राज्यपाल यांनी निदेशित केले आहे की, सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेष निर्मूलनासाठीचे नियतवाटप काटेकोरपणे निदेशानुसार आणि त्या विभागाच्या नियमित योजनांतर्गत नियतव्ययापेक्षा जास्तीचे असावे.

२६ सार्वजनिक आरोग्य आणि उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्रांच्या नियतव्ययाचा मोठा भाग चालू स्थापत्य कामांसाठी आहे. राज्यपाल यांनी सार्वजनिक आरोग्य, उच्च आणि तंत्र शिक्षण, नियोजन, वित्त आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामध्ये समन्वय असण्याच्या आवश्यकतेवर भर दिला आहे, जेणेकरुन अनुशेष निर्मूलनासाठीच्या निधीचा वापर होईल आणि अभियान पद्ध्तीने कामे पूर्ण होतील.

### उर्वरित योजनांतर्गत नियतव्ययाचे वाटपाची तत्वे

२७ सिंचन क्षेत्रासाठी असलेले नियत वाटप आणि अनुशेष असलेल्या इतर क्षेत्रांमधील अनुशेष दूर करण्यासाठी असलेला निधी वजा केल्यानंतर, योजनांतर्गत उर्वरित नियतव्ययाचा विभाज्य भाग, तीन प्रदेशांमध्ये त्या त्या प्रदेशाच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात संवितरित करण्यात यावा. असे करतांना जनगणना २०११ ची आकडेवारी विचारात घ्यावी. योजनांतर्गत उर्वरित नियतव्ययाच्या प्रदेशनिहाय नियत वाटपात, त्या क्षेत्रामधील त्या त्या प्रदेशांच्या गरजा व विकासाच्या संधी यांचा विचार करुन, त्या तीन प्रदेशांमध्ये क्षेत्रनिहाय वितरण करण्याची लवचिकता असेल. तथापि प्रदेशाची सर्व क्षेत्रीय नियतव्ययाची एकूण रक्कम ही योजनांतर्गत उर्वरित नियतव्ययातील त्या प्रदेशाच्या हिश्श्याच्या एकूण कमाल मर्यादेच्या अधिन राहील.

२८ राज्यपालांच्या पूर्वमान्यतेशिवाय, कोणताही निधी अनुशेष असलेल्या जिल्हयांकडून अनुशेष नसलेल्या जिल्हयांकडे आणि एका विकास मंडळांच्या क्षेत्राकडून दुस-या विकास मंडळाच्या क्षेत्राकडे वळविता येणार नाही.

### विकास मंडळे

२९ प्रत्येक विकास मंडळांनी कमीत कमी दोन जिल्हयांचा जिल्हा विकास अहवाल तयार करावा हे निदेश दिनांक १७ मार्च, २०१२ च्या निदेशाप्रमाणे चालू राहतील. जिल्हयांची निवड करतांना विकास मंडळांनी मानव विकास निर्देशांक कमी असलेल्या जिल्हयांना प्राधान्य दयावे. आणखी, विकास मंडळांच्या उद्‌देशानुसार मंडळांनी इतर अभ्यासही घेऊ शकतात. वरील जबाबदा-या पार पाडण्यासाठी राज्यपालांनी विकास मंडळांना **रु.२ कोटी** राखून ठेवावेत असे निदेश दिले आहेत. नियोजन विभागाने मंडळांच्या आवश्यकतेनुसार त्यांना निधी उपलब्ध करुन दयावा.

### तज्ज्ञ समिती

३० समन्यायी प्रादेशीक विकासाबाबतच्या उच्चस्तरीय समितीने आपला अहवाल राज्यपाल यांना सादर केला आहे. राज्यपाल यांनी या अहवालाबाबत राज्यशासनाचे मत मागविले आहे. राज्यपाल यांची अशी अपेक्षा आहे की, राज्यशासन हा अहवाल, समितीच्या शिफारशी , नियतवाटपांची तत्वे यांसह विचारार्थ घेईल आणि यावरील आपली मते तातडीने राज्यपाल यांच्या विचारार्थ सादर करेल.

### अनुच्छेद ३७१ (२) (क) नुसार राज्यपालांची विशेष जबाबदारी

३१ संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) (क) आणि विकास मंडळे आदेश २०११ च्या खंड १० नुसार, राज्यपाल यांना प्रत्येक विकास मंडळ क्षेत्राअंतर्गत तंत्रशिक्षण व व्यवसाय प्रशिक्षण यांसाठी पर्याप्त सुविधा आणि राज्यशासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या पर्याप्त संधी उपलब्ध करणारी समन्याय व्यवस्था करण्याबाबतची विशेष जबाबदारी आहे. राज्यपालांनी विकास मंडळ क्षेत्र निहाय तंत्रशिक्षण व व्यवसाय प्रशिक्षण

यासाठीच्या पर्याप्त सुविधा आणि राज्यशासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या संधी याबाबतच्या सदयास्थितीचा आढावा घेण्याची इच्छा व्यक्त केली आहे. राज्यपाल यांचे असे निदेश आहेत की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने गेल्या तीन शैक्षणिक वर्षासाठीची तंत्र शिक्षण व व्यवसाय प्रशिक्षण देणा-या संस्था, त्यांच्याकडील विदयार्थी प्रवेश क्षमता आणि विदयार्थी प्रवेशांचे क्षेत्र-निहाय प्रतिनिधीत्व याबाबतची माहिती सादर करावी. राज्य आणि केंद्र शासन तसेच अनुदानित व विनाअनुदानित खाजगी संस्था यांचा या माहितीमध्ये अंतर्भाव असावा. राज्यपाल यांनी आणखी असेही निदेश दिले आहेत की, सामान्य प्रशासन विभागाने राज्यशासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये क्षेत्रनिहाय प्रतिनिधित्वाबाबतची आकडेवारी सादर करावी. स्थानिक स्वराज्य संस्था, स्वायत्त संस्था आणि सरकार पुरस्कृत महामंडळे या बाबतची महितीही यामध्ये विचारात घ्यावी. राज्यपाल यांचे असे निदेश आहेत की, या माहितीमध्ये विषमता आढळल्यास, त्या दूर करण्याच्या शिफारशींसह जुलै २०१४ पर्यंत सादर करावे.

**निदेशांचे अनुपालन**

३२ महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ११ (च) आणि कलम २१ (१) व (२) मधील तरतुदींनुसार, राज्यपालांच्या निदेशांच्या अंमलबजावणीवर संनियंत्रणाची जबाबदारी, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे सोपविण्यात आलेली आहे. त्यानुसार, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने सिंचन क्षेत्राशी संबंधीत निदेशांच्या अंमलबजावणीचा नियतकालीक आढावा घ्यावा आणि राज्यपालांच्या माहितीसाठी तिमाही अहवाल सादर करावेत.

३३ राज्यपाल यांनी त्यांच्या दि. १० मार्च, २०११ च्या निदेशामध्ये सिंचन क्षेत्रासह सर्व क्षेत्रांचे प्रदेशनिहाय नियतव्यय आणि खर्चाबाबत तपशीलवार माहिती संकलित करण्याची कार्यप्रणाली विकसीत करण्याबाबत आदेशीत केले होते. राष्ट्रपतींचे दिनांक ९ मार्च १९९४ रोजीचे आदेश आणि भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ च्या खंड (२) चे उपखंड (ख) नुसार योजनेत्तर विकास खर्चाचे प्रदेश निहाय समन्यायी वाटप देखील राज्यपाल यांच्या कार्यकक्षेत येत असल्यामुळे, राज्यपाल यांनी वित्त विभागाला योजनेत्तर खर्चाची आकडेवारीसुध्दा प्रसिध्द करण्याविषयी निदेश दिले होते. राज्यपाल यांनी या दोन्ही निदेशांचे अनुपालन न झाल्याबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

३४ राज्यपालांच्या दिनांक १३ मार्च २०१३ च्या निदेशातील **परिच्छेद ३८** नुसार निदेशांच्या अंमलबजावणीबाबत विभागीय आयुक्तांनी जलसंपदा, सार्वजनिक आरोग्य, उच्च व तंत्र शिक्षण आणि कृषी संचाचे विद्युतीकरण या क्षेत्रांच्या अनुशेष निर्मूलनाबाबत त्रैमासिक आढावा घेण्याबाबत राज्यपाल यांनी निदेश दिले होते. राज्यपाल यांनी असी नोंद घेतली आहे की, काही विभागीय आयुक्तांनी नियमीतपणे प्रगतीचा आढावा घेतला मात्र संबंधीत विभाग विभागीय आयुक्तांनी त्यांचे अहवालात उपस्थीत केलेल्या अडचणींच्या सोडवणुकीबाबत अपयशी ठरले आहेत. विभागीय आयुक्तांनी अनुशेष निर्मूलन कार्यक्रमाच्या कामांच्या प्रगतीचा त्रैमासीक आढावा घेण्याबाबतचे निदेश चालू राहतील.

३५ राज्यपाल यांनी मागील काही निदेशांचे पूर्ण अनुपालन झाले नसल्याबाबत चिंता व्यक्त केली आहे. नियोजन विभागाने दि. २७ मे, २००९ च्या निदेशातील परिच्छेद ५४ नुसार योजनांचे परिणाम निर्धारण अभ्यास तसेच परिच्छेद ४१ नुसार प्रकल्पांच्या कालापव्यय आणि दरवाढी संदर्भीचा अहवाल अद्याप सादर केलेला नाही. राज्यपालांच्या दि.१३ मार्च २०१३ च्या परिच्छेद ३७ नूसार नियोजन विभागाने अविभाज्य खर्चाची बाबनिहाय वर्गवारी आणि तो खर्च संबंधीत प्रदेशासाठी दाखविण्याबाबतचे वर्गीकरण या संदर्भात कार्यवाही केली नाही. हे अनुपालन तातडीने पूर्ण होतील अशी अपेक्षा राज्यपाल यांनी व्यक्त केली आहे. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, मुख्य सचिवांनी चालू तसेच पूर्वीच्या निदेशातील अनुपालनांचा आढावा घ्यावा आणि धोरणात्मक मुद्दे असल्यास त्यांचे शासनस्तरावर योग्य निराकरण करावे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,**

**(विकास चन्द्र रस्तोगी)**
**राज्यपालांचे सचिव**

**राजभवन, मुंबई.**
**दिनांक : १५ फेब्रुवारी, २०१४.**